महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३० वा दिनांक : १८/१०/२०२४ वार : शुक्रवार

## कामे केली असती तर दौरे करायची वेळ आली नसती — उदयनराजे भोसले





**सातारा :** महाराष्ट्रात फुल स्विंग आणि फुल स्विपध्ये महायुतीचे सरकार येईल, असा विश्वास खासदार उदयनराजे भोसले यांनी व्यक्त केला आहे. विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्दे नसल्यामुळे ते योजनांवर टीका करत आहेत. विरोधक जर योजनांना नावे ठेवत आहेत, तर त्यांनी त्या योजना का आणल्या नाही? असा सवालही उदयनराजे यांनी केला. तसेच त्यांनी शरद पवारांबाबतही भाष्य केले. शरद पवारांनी कामे केली असती तर त्यांना आता इतके दौरे करावे लागले नसते, असा टोला उदयनराजे यांनी लगावला आहे.

उदयनराजे भोसले यांनी शिवेंद्र राजे यांचा प्रचार करणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले, मी आणा शिवेंद्र राजे आम्ही आमचे काम करत आहोत. आम्ही अनेक कामे मार्गी लावली आहेत. आमचे काम हाच आमचा अजेंडा आहे. जिल्ह्यातल्या प्रत्येक मतदारसंघात मी फिरणार असून जिथे गरज लागेल तिथे मी प्रचार करणार असल्याचे उदयनराजे म्हणाले.

बोलण्यासाठी मुद्दे नसल्याने योजनांवर टीका करतात महाराष्ट्रात फुल स्विंग आणि फुल स्विपध्ये महायुतीचे सरकार येईल, असा उदयनराजे यांनी व्यक्त केला. पुढे ते म्हणाले, विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्देच नाहीत, त्यामुळे ते योजनांवर टीका करत आहेत. जर योजनांना हे नावे ठेवत आहेत तर त्यांनी त्या योजना का आणल्या नाही? असा सवालही त्यांनी विरोधकांना विचारला आहे. स्वतः कुठल्या योजना आणायच्या नाहीत. दुसऱ्याने आणल्या तर त्याला नावे ठेवायची आणि टीका करत बसायची एवढेच यांना जमते. असा टोलाही त्यांनी लगावला.

...म्हणून शरद पवारांना दौरे करावे लागत आहे उदयनराजे यांनी शरद पवार यांच्यावरही भाष्य केले आहे. शरद पवारांचे पश्चिम महाराष्ट्रात दौरे वाढले आहेत तर वाढू द्या. लोकशाही त्यांना दौरे काढण्याचा अधिकार आहे. मात्र दौरे का वाढले आहेत? याचा विचार त्यांनी केला पाहिजे, असे उदयनराजे म्हणाले. त्यांनी कामे केली का? ती केली असती तर इतके दौरे करावे लागले नसते. कृष्णा खोऱ्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता, त्यावेळी शरद पवारांनी तो का केला नाही? असा सवाल त्यांनी विचारला.

शरद पवारांनी कामे केली असती तर त्यांना सांगता आली असती. ती नाहीत म्हणून त्यांना दौरे वाढवावे लागत आहेत, असा टोला उदयनराजे यांनी शरद पवारांना लगावला आहे. महायुतीने कामे केली आहेत त्यामुळे महायुतीने रिपोर्ट कार्ड आणले आहे. यांनी काही कामेच केलेली नाहीत, त्यामुळे हे टीका करत आहेत. असेही उदयनराजे यांनी म्हटले आहे.

## नांदेड लोकसभा पोटनिवडणूक - रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी

**नांदेड :** काँग्रेसने नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी आपल्या उमेदवाराच्या नावाची घोषणा केली आहे. पक्षाने येथून आपले दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्याची घोषणा केली आहे.

निवडणूक आयोगाने मंगळवारी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीची घोषणा केली होती. त्यानुसार या ठिकाणी २० नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होईल. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या स्क्रीनिंग कमिटीची बुधवारी दिल्लीत बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रातील विधानसभेच्या जवळपास ८४ जागांवर चर्चा झाली. त्यापैकी ६२ जागांवर बैठकीत एकमत झाले. या बैठकीत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे सुपुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्याचाही निर्णय घेण्यात आला. त्यानुसार स्क्रीनिंग कमिटीच्या बैठकीच्या दुसऱ्याच दिवशी यासंबंधीचा निर्णय जाहीर करण्यात आला.

नांदेड लोकसभेचे खासदार वसंत चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी निधन झाले होते. त्यामुळे त्यांची जागा रिक्त झाली होती. त्यानंतर नांदेड जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या बैठकीत वसंतराव चव्हाण यांचे चिरंजीव रवींद्र चव्हाण यांनाच उमेदवारी देण्याचा ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुसार आज त्यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे.

## नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक लढवणार - इम्तियाज जलील



**नांदेड :** एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेमुळे त्यांचा सामना काँग्रेसचे येथील उमेदवार रवींद्र चव्हाण यांच्याशी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपने अद्याप येथून उमेदवार दिला नाही. दरम्यान, जलील यांनी छत्रपती संभाजीनगर येथून विधानसभा निवडणूक लढवण्याचेही संकेत दिलेत.

इम्तियाज जलील म्हणाले, मला नांदेडमधून लोकसभा निवडणूक लढवण्याची संधी मिळत आहे. तसेच लोकांमध्ये देखील रोष पाहायला मिळत आहे. मी महाराष्ट्रातील एकमेव मुस्लिम खासदार होतो, मला पाडण्यासाठी महाराष्ट्रातील लोकांनी कशी मेहनत घेतली, हे तर सर्वांना माहीतच आहे. एमआयएम हा पक्ष महाराष्ट्रात आल्यानंतर सर्वात जास्त प्रतिसाद आम्हाला नांदेडमध्ये मिळाला होता. आमच्यावर काही आरोप झाले तरी आम्ही घाबरत नाहीत. भाजपची 'बी' टीम आम्हाला म्हणतात, आम्ही हे आरोप गेल्या अनेक वर्षांपासून पाहत आहोत. आता आम्ही या आरोपांना काडीचेही महत्त्व देत नाहीत. आम्हाला संधी आल्यानंतर आम्ही दिवंगत खासदाराबाबत का विचार करु? आम्ही आमच्या पक्षाबाबत विचार करणार असल्याचे इम्तियाज जलील यांनी स्पष्ट केले आहे.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने दिवंगत वसंतराव चव्हाण यांचे पुत्र रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देत काँग्रेसने चांगलीच खेळी खेळली असल्याचे दिसत आहे. मात्र याला विरोध म्हणून एमआयएमचे नेते इम्तियाज जलील देखील तयार असल्याचे दिसत आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसोबत नांदेडची लोकसभा निवडणूक पार पडणार आहे.

काँग्रेसचे दिवंगत नेते वसंतराव चव्हाण यांनी भाजपचे उमेदवार प्रतापराव चिखलीकर यांचा पराभव करत नांदेड लोकसभेतून खासदार म्हणून निवडून आले. मात्र खासदार वसंतराव चव्हाण यांचे अवघ्या तीन महिन्यातच निधन झाले. त्यामुळे नांदेडमध्ये पोटनिवडणूक लढवली जाणार आहे.

## परिवर्तन महाशक्ती आघाडी १५० जागा लढणार - बच्चू कडू

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात तयार झालेली तिसरी आघाडी म्हणजे परिवर्तन महाशक्ती आघाडीची महत्त्वाची बैठक पुण्यात पार पडली आहे. या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. परिवर्तन महाशक्तीने या बैठकीत महाराष्ट्रातील १५० जागांबाबत निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात देखील उमेदवार देण्याची तयारी या बैठकीत करण्यात आली आहे.

तुम्ही कसले परिवर्तन आणणार?

या बैठकीत बोलताना बच्चू कडू यांनी शरद पवारांवर देखील टीका केली आहे. बच्चू कडू म्हणाले, सामान्य माणसाला आपले वाटेल असे सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न आम्ही करू. आम्ही चांगले उमेदवार देणार आहोत. पवारसाहेब म्हणतात परिवर्तन आणू, तुम्ही कसले परिवर्तन आणणार आहात? तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसे काय परिवर्तन तुम्ही आणणार आहात? असा सवाल बच्चू कडू यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, परिवर्तनाचा अधिकार महायुतीलाही नाही आणि महाविकास आघाडीलाही नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला आहे. नवीन परिवर्तन हे खऱ्या अर्थाने कामाचे असेल, बजेटमधील हिस्सा हा सामान्य माणसाचा असेल, असे बच्चू कडू म्हणाले.

प्रस्थापित लोकांच्या विरोधात लढा देणारे उमेदवार देणार

या बैठकीत बोलताना राजू शेट्टी म्हणाले, स्वच्छ चारित्र्याचे उमेदवार आम्ही या निवडणुकीत देणार आहोत. आमच्याकडे छोट्या मोठ्या ३० ते ४० संघटना असल्याचे देखील राजू शेट्टी यांनी सांगितले. पुढे बोलताना छत्रपती संभाजीराजे म्हणाले, प्रस्थापित लोकांच्या विरोधात लढा देणारे उमेदवार देणार आहोत. मनोज जरांगे पाटील यांच्याशी माझे बोलणे झाले आहे. पण त्यांनी अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यांनी आमच्यासोबत यावे, अशी आमची इच्छा असल्याचे संभाजीराजे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४


## छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ. गणेश बळीराम डोंगरे तर तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ. शशिकांत रंगनाथ डिकले यांची नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर** :आज छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचालित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य म्हणून डॉ. गणेश डोंगरे तर तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य म्हणून डॉ. शशिकांत डिकले यांची संस्था सचिव श्री. पद्माकर मुळे यांनी आज (१६ ऑक्टो रोजी ) नियुक्ती केली आहे.

डॉ. गणेश बळीराम डोंगरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथून पीएच. डी. (इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, मास्टर ऑफ इंजिनिअरिंग, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर), बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग (श्री तुळजाभवानी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग तुळजापूर). एम. बी. ए. असून त्यांचे शालेय शिक्षण मुळ गाव देवळा, ता. वडवणी, जी. बीड येथून झाले आहे.

डॉ. डोंगरे मागील १५ वर्षापासून छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक येथे प्राचार्यपदावर कार्यरत असून शिक्षण व इंडस्ट्री क्षेत्रामधे 23 वर्षा पेक्षा जास्त अनुभव त्यांना आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक शोधनिबंध सादर केले आहेत.

डॉ. शशिकांत रंगनाथ डिकले यांनी पीएच डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथून तसेच मास्टर ऑफ इंजिनिअरिंग (गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज, छत्रपती संभाजी नगर) व बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग (तेरणा इंजिनिअरिंग कॉलेज, धाराशिव) येथून झाले आहे. त्यांना १५ वर्षाचा प्रशासकीय अनुभव आहे.

त्यांच्या निवडीचे छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था अध्यक्ष श्री. रणजीत मुळे, विश्वस्त श्री. समीर मुळे, सदस्य ऍड. उदयसिंह शिसोदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ. प्रवीण बैनाडे, मनुष्यबळ विकास अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.

# खरी शिवसेना-राष्ट्रवादी कोणाची? सुप्रीम कोर्टातील सुनावणी टळली



**नवी दिल्ली** : महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर होण्या आधीच आमदार अपात्र प्रकरणाचा निकाल न्यायालयाने द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे तथा शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आली होती. मात्र आता आचारसंहिता लागली आहे. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहे. यानंतरही अद्याप या प्रकरणाचा निकाल समोर आलेला नाही. या प्रकरणाची आज होणारी सुनावणी देखील पुढे ढकलण्यात आली असून आता मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे दहा नोव्हेंबरला निवृत्त होत आहेत. त्यामुळे त्यांच्या निवृत्तीपूर्वी या प्रकरणाची सुनावणीसाठी सहा दिवस मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या निवृत्तीपूर्वी या प्रकरणाचा निकाल लागला नाही, तर हे प्रकरण पुन्हा नवीन न्याय पीठासमोर जाण्याची शक्यता आहे.

तसे झाल्यास या प्रकरणाची सुनावणी आणखी लांबणीवर पडू शकते. हे प्रकरण दुसऱ्या न्यायपीठासमोर वर्ग झाल्यास त्यांना आणखी उशीर होईल. त्यामुळे आमदार अपात्रता

प्रकरणावर सुनावणी लवकर करा

यची असेल तर हे प्रकरण आधी नमूद करावे लागणार असल्याचे तज्ञांनी म्हटले आहे.

याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे वकील सिद्धार्थ शिंदे यांनी एका वृत्तपत्राशी बोलताना सांगितले की, विधानसभा निवडणूक आचारसंहिता आणि आमदार अपात्रता प्रकरणाचा संबंध नाही. हे प्रकरण आधीच न्यायालयाच्या पटलावर आहे. जोपर्यंत हे प्रकरण पटलावर आहे, तोपर्यंत त्यावर सुनावणी होऊ शकते. या प्रकरणाचे महत्त्व अधोरेखित करून दोन्ही बाजूच्या वकीलांनी हे प्रकरण तातडीने सुनावणीसाठी घेण्याची विनंती करायला आली हवी होती. मात्र आतापर्यंत सप्टेंबर महिन्यात आणि आतापर्यंत तसेच झाले नसल्याचे देखील सिद्धार्थ शिंदे आणि नमूद केला आहे. नमूद केल्याशिवाय या प्रकरणावर लवकरात लवकर सुनामी होण्याची शक्यता कमी दिसत असल्याचेही ते म्हणाले.

सप्टेंबर महिन्यामध्ये हे प्रकरण तब्बल आठ वेळा सूचीबद्ध करण्यात आले होते. त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात देखील या प्रकरणे तीन वेळा सूचीबद्ध करण्यात आले आहे. मात्र यातील एकाही वेळी या प्रकरणी सुनावणी होऊ शकली नाही. गेल्या काही महिन्यांमध्ये या प्रकरणाला तारीख पे तारीख मिळत आहे. त्यामुळे आता विरोधकांच्या वतीने न्यायालयावर देखील टीका करण्यात येत आहे.

राष्ट्रवादीच्या मागच्या सुनावणीत काय झालं...

२५ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत शरद पवारांच्या वकिलांनी दावा केला होता की अजित पवार यांनी शरद पवारांना आपले दैवत म्हटले होते आणि ते सर्व एकत्र असल्याचे म्हटले होते. अजित पवार गटाने न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशाचे पालन केले नाही, त्यामुळे न्यायालयाने अजित पवार गटाला विधानसभा निवडणुकीसाठी नवीन निवडणूक चिन्हासाठी अर्ज करण्याचे निर्देश द्यावेत, असे वकील म्हणाले.

खरेतर, शरद पवार गटाने निवडणूक आयोगाच्या ६ फेब्रुवारीच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती, ज्यामध्ये अजित पवार गटाला खरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी) आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'घड्याळ' म्हणून मान्यता देण्यात आली होती. वाटप केले होते.

निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अजित पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांचे निवडणूक चिन्ह 'घड्याळ' वापरण्यापासून रोखता यावे, यासाठी शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती.

# सतीश चव्हाण हाताचे 'घड्याळ' सोडणार



**गंगापूर** : गंगापूर विधानसभा मतदारसंघाच्या आखाड्यात उतरण्याची इच्छा असणारे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराज आहेत. त्यांनी लिहिलेल्या एका पत्रामुळे त्यांच्यावर पुढील २ दिवसांत शिस्तभंगाची कारवाई होईल असा इशारा राष्ट्रवादीचे प्रदेशाधयक्ष सुनील तटकरे यांनी दिला आहे.

असे असले तरी सतीश चव्हाण हे शरद पवारांची तुतारी हाती घेऊन आपली निवडणूक लढवण्याची इच्छा पूर्ण करतील अशी ठळक चिन्हे आहेत. यामुळे गंगापूर विधानसभेचे राजकारण चांगलेच तापले आहे.

लेटरबॉम्बमुळे आमदार सतीश चव्हाणांची होणार हकालपट्टी

राष्ट्रवादीत बंड झाल्यानंतर अजित पवारांसोबत गेलेले मराठवाडा पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण यांनी आचारसंहिता लागताच आपल्याच सरकारविरोधात सूर आळवायला सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी होण्याचे संकेत आहेत.

'बहुजनांचे प्रश्न सुटतील, या उद्देशाने आम्ही महायुती सरकारमध्ये सहभागी झालो. मराठा, धनगर, ओबीसी, आदिवासी, मुस्लिम आरक्षणाच्या प्रश्नावर सरकार मार्ग काढेल अशी अपेक्षा होती. मात्र सरकार यावर मार्ग काढू शकले नाही, बहुजनांचे प्रश्न सोडवू शकले नाही', अशी खंत चव्हाण यांनी पत्रकाद्वारे व्यक्त केली. त्याची राष्ट्रवादीने दखल घेतली आहे. त्यांच्यावर एक- दोन दिवसांत कारवाई होईल, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले.

नाराजीचे कारण गंगापूर मतदारसंघ

आमदार सतीश चव्हाण संस्थाचालक असून अजितदादांचे कट्टर समर्थक आहेत. त्यांना गंगापूरमधून निवडणूक लढवायची आहे. पण तिथे भाजपचे आमदार प्रशांत बंब आहेत. त्यामुळे युतीतून चव्हाणांना तिकीट मिळू शकत नाही. त्यामुळे चव्हाण हे शरद पवार गटात जाऊन तिकीट घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. गेली अनेक दिवस आपल्या आमदार निधीतून ते या मतदारसंघात कामे करत आहेत. गाव भेटीदेखील करत असल्याचे दिसून येत आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## महादेव जानकरांचा पहिला उमेदवार बारामतीतून



**मुंबई :** राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर बारामतीत उमेदवार देण्याच्या तयारीत आहेत. पहिल्या यादीत बारामतीच्या उमेदवाराचे नाव असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जानकर यांच्या पक्षाची १०० उमेदवारांची पहिली यादी जाहीर होऊ शकते. महादेव जानकर महायुतीतून बाहेर पडल्यानंतर त्यांनी निवडणुकीसाठी युतीविरोधातच दंड थोपटले आहेत.

वास्तविक महादेव जानकर यांना राज्यपाल नियुक्त यादीत विधान परिषदेवर वर्णी लावू, असे आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र आता या यादीत नाव नसल्याने जानकर नाराज झाले आहेत. त्यामुळे त्यांनी युती मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या आधी परभणी लोकसभा मतदारसंघातून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोट्यातून उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर महादेव जानकर राज्यपाल नियुक्त कोट्यातून विधान परिषदेवर जाण्यास इच्छुक होते. त्यासाठी महायुतीने विचारात न घेतल्याने महादेव जानकर नाराज आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच राष्ट्रीय समाज पक्षाने भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए म्हणजेच महायुतीसोबत संबंध तोडले आहेत. रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी बुधवारी आपला पक्ष विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार असल्याची घोषणा केली. रासप राज्यातील सर्व २८८ जागांवर आपले उमेदवार उभे करणार आहे. अशा परिस्थितीत रासपच्या एनडीएपासून फारकत घेतल्याने कोणाचा फायदा होणार? कोणाला फटका बसणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीमधील जागावाटपाचा अंतिम फॉर्म्युला अद्याप ठरलेला नाही. जागांसाठी सुरू असलेल्या वादाच्या दरम्यान, रासपने स्वतःला दूर केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपापूर्वी त्यांच्या पक्षाशी कोणतीही चर्चा न झाल्याने महादेव जानकर एनडीएवर नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जागावाटपावरून मंथन सुरू आहे. अशा स्थितीत त्यांना बाजूला ठेवण्यात आल्यामुळे त्यांनी महायुतीपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातच विधान परिषदेवर वर्णी लावण्याची त्यांची मागणीही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत त्यांनी स्वतंत्र चूल मांडण्याचा निर्णय घेतला आहे.

## भाजपच्या प्रचारासाठी संविधानाचा चुकीचा वापर - संजय राऊत



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत भारतातील जनतेने मोदींचे बहुमत काढून टाकले. त्यावेळी संविधान वाचवण्याचा लढा आम्ही दिला होता. त्यामुळेच आता न्यायालयातील काहींनी न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टीत काढून टाकली असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. त्यामुळे आता न्यायदेवता उघड्या डोळ्यांनी भ्रष्टाचार पाहणार आहे, अशा शब्दात त्यांनी निशाणा साधला.

न्यायदेवतेच्या हातातील तलवार काढून संविधान देण्यात आले आहे. हा भाजपचा प्रचार असून आएसएसचा अजेंडा असल्याचा आरोपही राऊत यांनी केला आहे.

देशात सर्वात जास्त शिवसेनेवर अन्याय झाला आहे. गेल्या दहा वर्षात न्यायदेवता न्याय देत नसल्याचा आरोप त्यांनी केला. न्यायदेवतेच्या हातात संविधान देणे हा आरएसएसचा अजेंडा असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. सर्वांना समान न्याय देण्यासाठी न्याय देवतेच्या हातामध्ये तलवार देण्यात आली होती. मात्र, आता गेल्या दहा वर्षात देशात न्याय होत नसल्याने तलवार काढून टाकण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यात गेली अडीच वर्षात संविधानाविरोधात सरकार चालते. मात्र, तरी देखील न्यायालयाने न्याय दिला नाही. त्यामुळे न्यायदेवतेवरचा विश्वास उडाला असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

ईव्हीएम मध्ये घोटाळा होत आहे. या देशातील जनतेचा विश्वास ईव्हीएमवर राहिला नाही. तरी देखील न्यायालयाने न्यायालयाने ईव्हीएमला क्लीन चिट दिली आहे. संविधानाचा चुकीचा वापर करून भाजपचा प्रचार केला जात असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. त्यामुळे आता न्यायालयातीलच काही लोक हे भाजपचे काम करत असल्याचा आरोप देखील आहे. संजय राऊत यांनी काल देखील सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर गंभीर आरोप केले होते.

## आम्ही आमदारकी पणाला लावून गुवाहटीला गेलो - शहाजी बापू

**सोलापूर :** शंभरपेक्षा जास्त आमदार असताना भाजपने मुख्यमंत्रिपदाचा त्याग केला आहे, असे वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एकनाथ शिंदेंना उद्देशून केले होते. त्याला आता 'काय झाडी, काय डोंगार' फेम सांगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आम्ही धाडस केले नसते तर तुमच्या त्यागाला काय महत्व होते, अशा शब्दांत शहाजी बापू पाटील यांनी भाजपला सुनावले आहे. आम्ही आमची आमदारकी पणाला लावली, असेही ते म्हणाले.

भारतीय जनता पक्षाने त्याग केला हा मुद्दा खरा आहे. पण आम्ही धाडक केले नसते तर तुमच्या त्यागाला काय महत्व असते? असा सवालही शहाजी बापू पाटील यांनी केला आहे. आम्ही आमच्या आमदारकी पणाला लावून गुवाहटीला गेलो होतो. हे धाडस आम्ही केले नसते तर भाजप सत्तेत आली नसती. देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी आम्ही गुवाहटीला गेलो होतो, असे पलटवार शहाजी बापू पाटील यांनी केला.

संजय राऊतांच्या टीकेलाही दिले उत्तर संजय राऊत यांनी न्यायदेवतेच्या डोळ्यावरील पट्टी काढल्यावरुन टीका केली होती. यावरही आमदार पाटील यांनी भाष्य केले आहे. न्याय हा उघड्या डोळ्यांनी करायचा असतो. न्यायदेवतेच्या हातात आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान दिले आहे, असे उत्तर पाटील यांनी राऊत यांच्या टीकेला दिले आहे.

विखे आणि सामंत यांच्या जरांगे भेटीवर केले भाष्य शहाजी बापू पाटील यांनी राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांच्या मनोज जरांगे भेटीवर देखील भाष्य केले आहे. जरांगे पाटील यांना पटवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्या भेटींमध्ये सकारात्मक चर्चा झाली असेल, असा विश्वास शहाजी बापू पाटील यांनी व्यक्त केला.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४


## बालरंगभूमी परिषद आयोजित दिव्यांग मुलांचा 'यहा के हम सिकंदर' महोत्सवाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर** - बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित व बालरंगभूमी परिषद संभाजीनगर जिल्हा शाखा नियोजित 'यहाँ के हम सिकंदर' हा दिव्यांग मुलांचा विविध कला गुणांचा महोत्सव दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपार २ वेळेत शहरातील तापडिया नाट्यगृहात रंगणार आहे.

या महोत्सवात जिल्ह्यातील १२ दिव्यांग शाळांमधील जवळपास २०० दिव्यांग बालकलावंत आपली कला सादर करणार आहेत. तसेच दिव्यांग मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थातर्फे बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री यावेळी करण्यात येणार आहे

या कार्यक्रमाचे आकर्षण दिव्यांग मुलांचे सांस्कृतिक कला प्रदर्शन सोबतच परिषदेच्या अध्यक्ष सिने अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यावेळी उपस्थित राहणार आहेत.

बालरंगभूमी परिषद तर्फे नुकताच छत्रपती संभाजीनगर शहरात शालेय विद्यार्थ्यांसाठी जल्लोष लोककलेचा कार्यक्रम मोठ्या दणक्यात झाला या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध लोककलांचे दर्शन शालेय मुलांनी घडवले. बालरंगभूमीचे स्वरूप केवळ मनोरंजनात्मक न राहता ती लोकचळवळ व्हायला हवी हा बालरंगभूमीचा मानस असून त्याचाच एक भाग म्हणून विशेष मुलांसाठी म्हणजे दिव्यांग मुलांसाठी 'यहा के हम सिकंदर'

या कला महोत्सवाच्या माध्यमातून त्यांना सांस्कृतिक रंगमंच उपलब्ध करून देण्याच्या बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष ॲड नीलम शिर्के-सामंत यांचा मानस आहे.

तसेच दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य करण्यासाठी व त्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना सक्षम प्रवाहात आणण्यासाठी अध्यक्ष ॲड. नीलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून सदर महोत्सव महाराष्ट्रभर आयोजित करण्यात येत आहे.

सदर महोत्सवाचे आयोजन संभाजीनगर येथील तापडिया नाट्यगृहात होणार असून या महोत्सवाचे स्वरूप स्पर्धात्मक न राहता प्रोत्साहनात्मक राहणार आहे. या महोत्सवात सहभागी होणाऱ्या प्रत्येक संघास पाच हजार रुपये मानदेय, सन्मानचिन्ह तसेच सहभागी दिव्यांग कालावंतांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

त्याचबरोबर सहभागी शाळेतील शिक्षकांचा देखील गौरव या ठिकाणी करण्यात येणार आहे. या महोत्सवांतर्गत विविध विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री या ठिकाणी करण्यात येणार असून या वस्तूंच्या विक्रीतून आलेली रक्कम त्या त्या शाळेलाच देण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी श्रीपाद पदे .८९७५९२३७७९ प्रदीप कांबळे. ९९७०६०३२३१ यांच्याशी संपर्क साधावा असे कळवण्यात आले आहे.

सदर दिव्यांग मुलांच्या कलागुणांचे कौतुक करण्यासाठी, त्यांचा हुरुप वाढवण्यासाठी तसेच दिव्यांग शाळांनी बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन पाहण्यासाठी व खरेदीसाठी शहरातील कला प्रेमींनी, सामाजिक संघटना, दानशूर व्यक्तींनी या महोत्सवास भेट द्यावी असे आवाहन बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेचे भाग्यरवी कुलकर्णी, डॉ. इकबाल मिन्ने, गोकुळ गायकवाड, वाल्मीक जाधव, असलम शेख, अभिजीत भातलोंढे, लक्ष्मण अहिरे, संतोष कुलकर्णी आदी सभासदांनी केले आहे.

## ऋषभ पंतच्या गुडघ्याला दुखापत



**बुंगळुरू :** टीम इंडिया आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बंगळुरूमध्ये सुरू झाला आहे. बंगळुरुच्या के एम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये खेळवल्या जाणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडच्या फलंदाजी दरम्यान अचानक पंतच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली. ज्यानंतर त्याला मैदान सोडून बाहेर परतावे लागले.न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील ३७व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर ऋषभ पंत जखमी झाला. यावेळी रवींद्र जडेजा गोलंदाजी करत होता. जडेजाने हा चेंडू डेव्हॉन कॉनवेकडे टाकला होता आणि चेंडू खूप वेगाने फिरला आणि चेंडू थेट पंतच्या उजव्या पायाच्या गुडघ्याला लागला. दुखापतीनंतर पंत कळवळला आणि जमिनीवर झोपला. फिजिओला बोलावण्यात आले. दुखापतीमुळे पंत रडताना दिसला आणि नंतर त्याला मैदानाबाहेर नेण्यात आले. त्यानंतर ध्रुव जुरेल याने यष्ठीरक्षणाची जबाबदारी स्विकारली.

डिसेंबर २०२२मध्ये पंतला कार अपघातात गंभीर दुखापत झाली होती. त्यांच्या डाव्या पायाला दुखापत झाली होती. सामन्या दरम्यान पंतचे बाहेर जाणे हिंदुस्थानसाठी चांगली गोष्ट नाही. त्याची दुखापत नेमकी किती गंभीर आहे. याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही.

## 'लाडकी बहीण' च्या जाहिरातबाजीवर २०० कोटी रुपयांची उधळपट्टी : अतुल लोंढे



**मुंबई :** काँग्रेस सरकारने कर्नाटक, तेलंगणा, हिमाचल प्रदेशमध्ये महिलांसाठी महालक्ष्मी योजना आणली, बसमधून मोफत प्रवासाची योजना लागू केली, शेतकऱ्यांचे कर्जमाफ केले, त्यासाठी काँग्रेस सरकारने इव्हेंट वा जाहिरातबाजी केली नाही, परंतु टेंडर घ्या व कमिशन द्या या भाजपा महायुती सरकारच्या धोरणानुसार 'लाडकी बहीण' योजनेच्या जाहिरातीवर भाजपा युती सरकारने २०० कोटींची उधळपट्टी केली आहे.

जनतेच्या कष्टाचा पैसा अशा पद्धतीने इव्हेंट, जाहिरातीबाजी आणि चमकोगिरीवर उधळून लूट सुरु आहे, असा प्रहार प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, भाजपा सरकारने प्रचंड महागाई करुन ठेवली आहे, ७० रुपयाचे तेल १२० रुपये केले, साखर, गुळ, डाळी, रवा अशा जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगणाला भिडल्या आहेत.

नोकऱ्या नाहीत त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे, शेतकऱ्यांना मदत नाही अशा परिस्थितीत 'लाडकी बहिण' योजनेची जाहिरातबाजी करून एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांना काय दाखवायचे आहे? यांनी घरातून पैसे दिले, की प्रॉपर्टी विकून पैसे दिले? ते जनतेचे पैसे आहेत, जनतेच्या कराच्या पैशांची अशा पद्धतीने उधळपट्टी केली जात असल्याने सामान्य माणसाला चीड आल्याशिवाय राहणार नाही, असेही अतुल लोंढे म्हणाले.

## अधिकाऱ्यांनी समाजसेवेचे व्रत घेऊन काम करावे : माजी पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित




**पुणे** अधिकाऱ्यांनी शासनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन आणले पाहिजे. अधिकाऱ्यांनी समाजसेवेचे व्रत घेऊन काम करावे, असे आवाहन माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी केले.

श्री मुकुंद भवन ट्रस्ट आणि विवेक स्पार्क फाउंडेशन संचलित स्पार्क अकॅडमी तर्फे प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन संघर्ष करत चिकाटी आणि जिद्दीने अधिकारी म्हणून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून प्रवीण दीक्षित बोलत होते.

स्पार्क अकॅडमीच्या मुलाखत बॅचच्या २८ विद्यार्थ्यांची राज्यसेवा २०२२ परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदासाठी तसेच 10 विद्यार्थ्यांची सरळ सेवेतून विविध पदासाठी निवड झाली. यानिमित्त हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून माजी उपजिल्हाअधिकारी आणि महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, श्री मुकुंद भवन ट्रस्टचे विश्वस्त पुरुषोत्तम लोहिया, विवेक स्पार्क फाऊंडेशनचे महेश पोहनेरकर, मुग्धा वाड, स्वागत दरख, मनीषा नर्डेकर आणि श्रीराम मंदिर ट्रस्टचे शरद सारडा आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रवीण दीक्षित म्हणाले की, नवनियुक्त अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार मुक्त कर्मयोगी होऊन जनसामान्यांची सेवा करावी.

यावेळी बोलताना माजी उपजिल्हाधिकारी आणि महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर म्हणाले की, प्रशासनात काम करत असताना सहकाऱ्यांना सोबत घेऊन काम करणे अतिशय महत्वाचे असते. सर्व सहकाऱ्यांच्या मनात संघ भावना असेल तर नागरिकांचे अनेक प्रश्न सोडविणे शक्य होते. एकत्रित कामाचा परिणाम दीर्घकाळ असतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४


## कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह उत्साहात




**मारेगाव :** कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मारेगाव येथील प्राणिशास्त्र विभागाद्वारे नुकताच वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. ज्यामध्ये जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धनाविषयी जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक आणि संवादात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सप्ताह दरम्यान साजऱ्या झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. याप्रसंगी प्राणिशास्त्र अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले व व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. परेश पटेल, सहयोगी प्राध्यापक, लो. टी. महा. वणी हे होते. तर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मारेगावचे प्राचार्य डॉ. अविनाश घरडे अध्यक्षीय स्थानी होते.

या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. विनोद चव्हाण, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख तसेच प्रा. डॉ. नविन शर्मा, प्राणीशास्त्र विभागप्रमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रा. डॉ. नविन शर्मा यांनी प्रास्तविकेद्वारे वन्यजिव सप्ताहाचे महत्व व वनपरिसंस्था हा विषय किती महत्वाचा आहे, हे पटवून दिले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. परेश पटेल लो. टी. महा. वणी यांनी वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व आणि नष्ट होत चाललेल्या प्रजातींचे संरक्षण यावर सखोल मार्गदर्शन केले.

त्यांचे रक्षण करणे ही केवळ नैतिक जबाबदारी नसून आपल्या अस्तित्वासाठी देखील आवश्यक आहे. याची जाणीव करून दिली. त्यानंतर प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी पर्यावरण संवर्धनाचे धोरणे आणि मानवी हस्तक्षेप कमी करण्याचे मार्ग याबद्दल माहिती दिली. याव्यतिरिक्त, वन्यजीव पोस्टर स्पर्धेत वन्यजीवांचे संवर्धन या विषयावर विविध पोस्टर सादर करण्यात आले होती. या स्पर्धेत आलीय शेख प्रथम, वैष्णवी धासले व्दितीय व भाग्यश्री मांजरे हिला तृतीय पारितोषिक मिळाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अविनाश घरडे यांनी सामाजिक बांधिलकी जपून याचे संवर्धन केले पाहिजे असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे संचालन हर्षदा देठे व वैष्णवी ढासले तर आभार प्रांजली अलाम यांनी केले. वन्यजीव कार्यक्रम यशस्वी आयोजनाकरिता विभागप्रमुख डॉ. नविन शर्मा, प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. सुधीर चिरडे, प्रा. कुणाल गेडाम, अभिजित पंढरपुरे तसेच इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## साडेचारशे विद्यार्थ्यांनी दिली गांधी विचार परीक्षा



**नंदुरबार :** शहरातील श्रीमती हि.गो. श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षा मोठ्या उत्साहात पार पडली. गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव व श्रीमती हि. गो. श्रॉफ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विद्यालयात इयत्ता पाचवी ते १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा व तत्वज्ञानाचा प्रभाव पडावा यासाठी परीक्षेचे आयोजन करण्यात येते. यंदा यात ४५० विद्यार्थी सहभागी झाले. शाळेतील पाच शिक्षकांनी गांधी विचार व तत्वज्ञानाचा अभ्यास करीत गांधी विचार परीक्षा दिली.

मुख्याध्यापिका सुषमा शाह, उपमुख्याध्यापक राजेश शाह, पर्यवेक्षक जगदीश पाटील, पर्यवेक्षिका सीमा पाटील व गांधी विचार विभाग प्रमुख हेमंत पाटील आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी शाळेतील शिक्षिका गायत्री पाटील, प्रतिभा साळुंखे, वर्षा पाटील, शिक्षक सुनील गिरासे व दिनेश देवरे यांनी 'बुनियादी शिक्षा' या अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा दिली. या परीक्षेचे समन्वयक म्हणून वैभव पाटील यांनी काम पाहिले.

शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांच्या मनावर गांधी विचारांचा प्रभाव पडावा तसेच गांधी विचारांचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी विद्यालयात स्वतंत्र 'गांधी विचार संस्कार विभाग' कार्यरत आहे. सदर परीक्षेसाठी गांधीजींचे विद्यार्थी जीवन, गांधीजींचा विद्यार्थ्यांना संदेश, राष्ट्र निर्माता बापू, बुनियादी शिक्षा व सार्वजनिक स्वच्छता यांसारख्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. गांधी तीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगितेत देखील शाळा सहभागी असून त्या अंतर्गत स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

### सुंदर सुविचार

आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तीव्र इच्छाशक्ती.

## जिल्हास्तरीय लोकनृत्य, अभिनय स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**यवतमाळ :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य व एनसीईआरटी नवी दिल्ली यांच्या विद्यमाने राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्प 2024-25 अन्वये मंगळवारी दि. 15 ऑक्टोबरला वाचन प्रेरणादिनाचे औचित्य साधून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ येथे जिल्हास्तरीय लोकनृत्य स्पर्धा व भूमिका अभिनय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. देवानंद सावरकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रमेश राऊत, समन्वयक अधिव्याख्याता सारिका पवार, अधिव्याख्याता धम्मरत्न वायवळ, अधिव्याख्याता मधुमती सांगळे यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी दिवंगत माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन जिल्हास्तरीय लोकनृत्य व अभिनय स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेचे प्रास्ताविक समन्वयक तथा अधिव्याख्याता सारिका पवार यांनी केले. या लोकनृत्य व अभिनय स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील शासकीय आश्रम शाळा, जि.प.शाळा, नगर पालिका, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय आदी शाळेत शिक्षण घेणाऱ्या इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. जिल्हास्तरीय लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यातील अव्वल ठरलेल्या सात शाळांनी सहभाग नोंदवला. सदर अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांनी मुले व मुली यांच्यात संधीची समानता, संयुक्त कुटूंबाची भूमिका, पर्यावरण संरक्षण, मादकद्रव्याचे सेवन रोखणे, पौगंडा अवस्थेतील निरोगी नाते संबंध आदी विषयांचा समावेश होता. या विषयावर नृत्यविष्कार करुन विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक जि.प.हायस्कुल लोणबेहळ यांनी पटकावले तर भूमिका अभिनय स्पर्धेत अनुसूचित जाती निवासी मुलांची शाळा इसापूर तालुका दिग्रस यांनी बाजी मारली.

विजेत्यांना दिले प्रशस्तीपत्र विजेत्या स्पर्धकांना मोमेन्टो व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. प्रथम आलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांची निवड विभागीय स्तरावर करण्यात आली. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून अमित राऊत, निर्मला खडसे यांनी काम पाहोले. साधनव्यक्ती वैशाली गायकवाड यांच्या नियंत्रणात स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निलीमा पाटील, कल्पना जुनघरे, वैशाली गायकवाड, राजहंस मेंढे आदिंनी प्रयत्न केले.